# ज्ञानेश्वर तुकाराम स्मृती व्याख्यानमाला उद्यापासून

संत श्री ज्ञानेश्वर तुकाराम स्मृती व्याख्यानमाला २००७ चे उद्घाटन येत्या शनिवारी (२४ नोव्हेंबर) साधू वासवानी मिशनचे प्रमुख दादा जे.पी.वासवानी यांच्या हस्ते होईल. अध्यात्म शास्त्राचे अभ्यासक श्रीकृष्ण ऊर्फ राजाभाऊ कर्वे कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी असतील.

आळंदी येथील माईर्स एम.आय.टी.चे विश्वशांती केंद्राचा संत श्री ज्ञानेश्वर तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमाला न्यास व युनेस्को अध्यासन वर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने २४ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेला जोडूनच माईर्स एमआयटी तील शिक्षक वर्गासाठी विश्वशांती संस्कृती प्रबोधन कार्यशाळा व योगासन वर्गाचेही आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेत चेन्नईच्या रामानुज मिशन ट्रस्टचे संस्थापक प्रसन्न व्ही.चतुर्वेदी, दिल्लीच्या भारती विद्याभवनाचे अध्यक्ष डॉ.जे.वीराराघवन, निवृत्त सरन्यायाधीश आर.सी.लाहोटी, तसेच दै. सकाळचे संपादक यमाजी मालकर, डॉ.जगदीश हिरेमळ, तसेच इतर अनेक अभ्यासकांची व्याख्याने होणा आहेत. व्याख्यानमालेच्या समारोप प्रसंगी म्हणजेच ३० नोव्हेंबर रोजी केंद्रीय परराष्ट्र मंत्री दिग्विजयसिंग प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच संगणकतज्ज्ञ पद्मश्री डॉ.विजय भटकर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी असतील. याबाबत बोलताना माईर्स एमआयटीच्या विश्वशांती केंद्राचे प्रमुख डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले की, विश्वशांतीचा संदेश जगात भारताच्या मार्गे पोहोचावा हाच या उपक्रमाचा उद्देश आहे. विनामुल्य असलेल्या व्याख्यामालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.